# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २४/०८/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

### वाहनासह एकुण १५,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २४/०८/२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, उखळी फाटा भिवापुर येथे टिप्परद्वारे अवैधरीत्या विनारॉयल्टी रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता स्टाफसह उखळी फाटा भिवापुर येथे नाकाबंदी केली असता १) टिप्पर क्र एम.एच— ४०/बीजी —७९१९ चा चालक **आरोपी नामे— विलास चंद्रभान परतेकी, वय ४० रा. करांडला ता. उमरेड जि. नागपुर २) कंडक्टर नामे— अमोल सयाम वय ३०रा. बोडेझरी उमरेड जि. नागपुर** यांनी आपल्या ताब्यातील वाहनात ०६ ब्रास रेती अंदाजे कि. ३०,०००/— रू व टिप्पर क्र एम.एच— ४०/बीजी —७९१९ चा मालक नामे— रोशण विष्णु लोणबले वय ३७ वर्ष रा. करांडला ता. उमरेड जि. नागपुर याचे सांगणेवरून मोहर्णा जि. भंडारा घाटातून भरून आणल्याचे सांगितले. आरोपीतांकडुन टिप्पर क्र एम.एच— ४०/बीजी —७९१९ किंमती १५,०००००/—रू. त्यामध्ये ०६ ब्रास रेती अंदाजे कि. ३०,०००/—रू असा एकुण किंमत १५,३०,०००/—रू चा मुद्देमाल अवैधरीत्या विनापरवाना वाहतूक करतांना मिळुन आल्याने घटनास्थळावरून जप्त करण्यात आला. आरोपी क्र. ०१ यास अटक करण्यात आली. अवैद्यरित्या विनापरवाना शासनाचा महसूल बूडवून रेती भरून सार्वजनीक मालमत्तेचे नूकसान करून रेतीची चोरटी वाहतूक करतांना मिळून आल्याने आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्याय सहीता ४८(७), ४८(८) म.ज. महसुल संहिता १९६६. सह.कलम ४, २१ . खानी. आणी खनिजे (विकास आणी नियमन)अधि.१९५७ स.क ३ सार्व.मालमत्ता नूकसान प्रति. अधि.१९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, सफौ किशोर ठाकुर, पोहवा राकेश त्रिपाठी, किशोर डेकाटे, पोअं. प्रितम खोपे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर